E/Jagruti/Kalam 88

"डिजीटाईज्ड कालबध्द सेवा वर्ष २०१५ (2015 - Year of Digitized and Time - Bound Services)"

## सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, भिवंडी तालुका, भिवंडी यांचे कार्यालय

जकात नाका, सेंट्रल हॉस्पीटलच्या वरती, दत्तात्रय कृपा बिल्डींग, तिसरा मजला, ता. भिवंडी, जि. ठाणे

२०३७

जा.क्र. सनिभि/बी-२/कलम ८८/जयहिंद पत./सन २०१६.
दिनांक :- १९/१२/२०१६.

# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये

## आदेश

**वाचावे :- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ मधील तरतुद**
**२) श्री. यु. एस. अहिरे, विशेष लेखापरिक्षक वर्ग -२ सहकारी संस्था (प्रक्रिया) ठाणे यांचा दिनांक ०६/०५/२०१४ चा प्रशासकिय विशेष अहवाल.**

ज्याअर्थी, **जयहिंद नागरी सहकारी पतसंस्था मर्या. युसुफ रमझान हौसिंग, ४ था निजामपुरा, आग्रारोड, भिवंडी, ता. भिवंडी, जि. ठाणे** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार नोंदणीकृत सहकारी पतसंस्था असून ती या कार्यालयाच्या कार्यकक्षेत येते आणि,

ज्याअर्थी, जयहिंद नागरी सहकारी पतसंस्था मर्या. भिवंडी, जि. ठाणे या संस्थेचे दिं. ०१/०४/२०११ ते ३१/०३/२०१२ या कालावधीचे वैधानिक लेखापरिक्षण श्री यु. एस. अहिरे, विशेष लेखापरिक्षक वर्ग-२, सहकारी संस्था (प्रक्रिया) ठाणे यांनी केले असून सदर कालावधीच्या लेखापरिक्षणाचा प्रशासकिय विशेष अहवाल त्यांनी दि. ०६/०५/२०१४ रोजी सादर केला असून सदर विशेष लेखापरिक्षण अहवालात त्यांनी संस्थेच्या कामकाजात सभासदांच्या ठेवीच्या रक्कमा परत करण्यास निधीची कमतरता, संस्थेचे व्यवहार पदाधिकारी व संचालक मंडळ यांनी पारदर्शकपणे न करणे. कायदा कानुन व पोटनियमाचे सर्रास उल्लंघन करुन कर्ज वितरण करणे, कमी दराने व्याज आकारणी अशा प्रकारच्या संस्थेच्या कामकाजात गंभीर बाबी व त्रुटी निदर्शनसा आल्या असल्याचे अहवालात नमुद करुन संस्थेस १,७६,३३,५००/- इतक्या रक्कमेचा गैरव्यवहार व आर्थिक नुकसान झाल्याचे नमुद केलेले आहे. सदर नुकसानीस जबाबदार असणाऱ्या तत्कालीन व्यवस्थापक समिती सदस्याकडुन आकारणी करण्याची शिफारस विशेष लेखापरिक्षक यांनी केलेली आहे आणि,

ज्याअर्थी, संस्थेच्या तत्कालीन सदस्यांनी पिग्मी ठेव तारण कर्जे, कमी जास्त दराने व्याज आकारणी संचालक व त्यांचे नातेवाईक यांचे कडील कर्जे, कर्मचारी व त्यांचे नातेवाईक यांचेकडील कर्जे अशा प्रकारची कर्जे वितरित करुन संस्थेस आर्थिक नुकसान झालेले असून सदर नुकसानीची जबाबदारी संस्थेच्या व्यवस्थापनात भाग घेतलेले तत्कालीन समिती सदस्याची व कर्मचारी यांची असून सदर नुकसानीची आकारणी करणे व नुकसानीची व्याजासह भरपाई करणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झालेली आहे आणि,

त्याअर्थी, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## : आदेश :

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी सुदाम काळे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, भिवंडी **जयहिंद नागरी सहकारी पतसंस्था मर्या. युसुफ रमझान हौसिंग, ४ था निजामपुरा, आग्रारोड, भिवंडी, ता. भिवंडी, जि. ठाणे** या संस्थेच्या व्यवस्थापनात भाग घेतलेले तत्कालीन व्यवस्थापक समिती सदस्य यांनी संस्थेच्या निधीचे केलेले उपयोजन, अपहार, त्यांनी केलेले अपकार्य व विश्वास घात व त्यामुळे संस्थेस झालेल्या आर्थिक नुकसानीची आकारणी करुन व्याजासह भरपाई करण्यासाठी प्राधिकृत अधिकारी म्हणुन **श्री एस. के. पाचंगे**, सहाय्यक निबंधक यांची नियुक्ती करीत आहे.